## कार्यकारी सारांश

### पार्श्वभूमी

विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड (व्हीआयपीएल), ह्या वीजनिर्मिती कंपनीने महाराष्ट्रातील नागपूर जिल्ह्यात बुटीबोरी येथे 600 मेवॉ (2X300 मेवॉ) वीजकेंद्र विकसित केलेले आहे. व्हीआयपीएलने रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आरइन्फ्रा) सह प्रकरण 2 सन 2013 अन्वये आदरणीय आयोगाकडे वीज खरेदी करारास (पीपीए) मान्यता मिळवण्यासाठी आणि व्हीआयपीएलच्या बुटीबोरी प्रकल्पासाठी हंगामी प्रशुल्क निश्चितीसाठी अर्ज केला होता.

'एमईआरसी'ने त्यांच्या दिनांक 20 फेब्रुवारी 2013 च्या आदेशान्वये बुटीबोरी स्थानकाच्या युनिट 2 मधून 300 मेवॉ वीज प्रापणाकरिता आरइन्फ्रा आणि व्हीआयपीएल ह्यांच्यादरम्यानच्या पीपीएसाठी 'तत्वतः' मान्यता दिलेली आहे. दि.19 जुलै 2013 च्या आदेशान्वये आदरणीय आयोगाने युनिट 1 मधून 300 मेवॉ वीज प्रापणासाठीच्या पीपीएला आणि दोन्ही पीपीएअंतर्गत पुरवठा दि. 1 एप्रिल 2014 पासून एकाच वीजकेंद्रातून होत असल्याचे मानण्याच्या एकत्रीकरण कराराला मान्यता दिलेली आहे.

व्हीआयपीएलने ही याचिका संपूर्ण वीजनिर्मिती केंद्रासाठी म्हणून हंगामी प्रशुल्कनिश्चिती करण्याच्या हेतूने एमईआरसी नियमावली, 2011 च्या नियम 38.4 अन्वये दाखल केलेली आहे.

### प्रकल्पाचा खर्च

***अंदाजे भांडवली खर्च :*** बुटीबुरी वीजकेंद्रांमध्ये प्रत्येकी 300 मेवॉ च्या दोन युनिट्सचा समावेश आहे. ह्या केंद्राचे पहिले युनिट (युनिट–1) 4 एप्रिल 2013 मध्ये सुरू करण्यात आले (सीओडी) आणि दुसरे युनिट (म्हणजे युनिट–2) डिसेंबर 2013 च्या अखेरीस /2014 च्या सुरुवातीस सुरू होईल अशी अपेक्षा आहे. प्रशुल्क नियमावलीतील प्रतिष्ठापित एकंदर तत्त्वांचा विचार करता, वीजकेंद्राचा एकूण भांडवली खर्च सीओडीच्या वेळी अंदाजे रु. 4132.36 कोटी इतका येईल अशी अपेक्षा आहे. सादर केलेला भांडवली खर्च संपूर्ण वीज केंद्राचा खर्च म्हणून सादर करण्यात आलेला असून तो पुढील विचारांवर आधारित आहे :

(i) उपरोक्त भांडवली खर्चामध्ये मे 2013 पर्यंतच्या बांधकामादरम्यानच्या व्याजाचा (आयडीसी) समावेश आहे आणि याचिकादार प्रकल्पाचे प्रत्यक्ष आयडीसी अंतिम प्रशुल्कनिश्चितीच्या वेळी सादर करतील. उपरोक्त भांडवली खर्चामध्ये युनिट 1 साठीच्या एप्रिल 2013 पर्यंतच्या (म्हणजे युनिट 1 सीओडी) आयडीसीचा समावेश आहे.

(ii) ह्या भांडवली खर्चात सी.ए. प्रमाणपत्रानुसार वरकड खर्च, सुरुवात करण्याचा खर्च आणि खरेदीदारांच्या उधारीच्या पतपूर्तीच्या वेळी दि. 31 मे 2013 रोजी पडलेला परकीय चलनातील फरक समाविष्ट आहे.

याचिकादार, आयडीसी व इतर विभाजनासहीत अंतिम भांडवली खर्च वीजकेंद्राच्या सीओडीनंतर अंतिम प्रशुल्कनिश्चितीच्या वेळी लेखापरीक्षित लेखा विवरणांसह सादर करतील.

***प्रशुल्कनिश्चितीच्या हेतूसाठी भांडवली खर्च :*** याचिकादार हे सादर करीत आहे की युनिट 1 ने सीओडी याअगोदरच साध्य केल्याने प्रशुल्कनिश्चितीच्या हेतूसाठी ह्या प्रकल्पाचे घटवलेले मूल्य विचारात घेणे गरजेचे आहे. ह्या याचिकेच्या हेतूसाठी याचिकादारांनी ह्या प्रकल्पाचे दि. 1 एप्रिल 2014 रोजीचे घटवलेले मूल्य रु. 4063.05 कोटी इतके विचारात घेतलेले आहे, ज्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे :

अ. याचिकादाराने मालमत्तांचे दि. 1 एप्रिल 2014 रोजीचे संभाव्य घटवलेले मूल्य विचारात घेतलेले आहे.
ब. याचिकादाराने एप्रिल 2013 ते मार्च 2014 ह्या काळासाठी रु. 69.31 कोटींचा घसारा कमी केलेला आहे.
क. वीजनिर्मिती केंद्राच्या घटवलेल्या मूल्याचा अंदाज करण्याच्या हेतूने यचिकादार सीओडी नंतर संबंधित घसाऱ्याची रक्कम अंतिम प्रशुल्कनिश्चितीच्या वेळी सादर करतील.

**प्रकल्पासाठी प्रकल्पनिधी पुरवठा आणि प्रशुल्कनिश्चितीसाठी डी/ई**

वीजनिर्मिती केंद्राच्या सीओडीच्या वेळी असणाऱ्या ऋण/ समभाग गुणोत्तराचा अंदाज 70:30 असा करून याचिकादारानी ते विचारात घेतले आहे. त्यानुसार केंद्राच्या भांडवली खर्चाचे दि. 1 एप्रिल 2014 रोजी घटविलेले मूल्य आधारभूत समजून एकंदर ऋण आणि समभाग घटकांचा तपशील खाली पुरविलेला आहे :

तक्ता 1 : दि. 1 एप्रिल 2014 रोजी घटविलेल्या भांडवल खर्चाच्या आधारे प्रकल्प निधीपुरवठा

| **निधीपुरवठ्याचा स्रोत** | **रक्कम** |
|---|---|
| भारतीय कर्ज* | रु. 2006.98 कोटी |
| ईसीबी* | रु. 602.65 कोटी ($ 128.57 दशलक्ष) |
| प्रकल्पाचा दिनांक1 एप्रिल, 2014 रोजीचा घटविलेला भांडवली खर्चभागविण्यासाठी प्रमाणकानुसारी अतिरिक्त कर्ज* | रु. 234.51 कोटी |
| **एकूण कर्ज** | रु. 2844.14 कोटी |
| **समभाग** | रु. 1218.92 कोटी |
| **एकूण भांडवली खर्च** | रु. 4063.05 कोटी |

**कर्जांच्या प्रत्यक्ष निवेशसंचात काही विशिष्ट परतफेडी गृहीत धरल्या आहे आणि म्हणून प्रमाणकानुसारी कर्जे 70:30 हे ऋण/समभाग गुणोत्तर कायम राखतील असे विचारात घेतले आहे.*

**एकंदर महसुली आवश्यकता**

***ऊर्जा आकारणी :*** याचिकादाराने देशांतर्गत दगडी कोळसा हे वीजनिर्मितीसाठी मुख्य इंधन म्हणून गृहीत धरलेले आहे. व्हीआयपीएलने डब्ल्यूसीएलसमवेत बुटीबोरी वीजकेंद्रासाठी जी9 च्या जीसीव्ही बँडसह 2.345 एमटीपीए दगडी कोळशाच्या पुरवठ्यासाठी करार (एलओए) केलेला आहे. प्रमाणानुसारी पीएलएफ साध्य करण्यासाठी कोळशाची आवश्यक राशी सुमारे 2.29 एमटीपीए इतकी आहे. 2014–15 आणि 2015–16 ह्या कालावधींसाठी एकंदर सीव्ही आणि देशांतर्गत कोळसा आणि दुय्यम तेले ह्या दोहोंसाठी उतरणखर्चासहित अपेक्षित इंधन किंमत पुढील तक्त्यामध्ये दिलेली आहे :

**तक्ता 2 : सीव्ही आणि इंधनाची किंमत**

| | आर्थिक वर्ष 2014–15 | | आर्थिक वर्ष 2015–16 | |
|---|---|---|---|---|
| | कॅलरीफिक मूल्य (KCal/kg) | उतरणखर्चासहित किंमत (रु./MT) | कॅलरीफिक मूल्य (KCal/kg) | उतरणखर्चासहित किंमत (रु./MT) |
| देशांतर्गत दगडी कोळसा | 4,750 | 2,017 | 4,750 | 2,127 |
| एफओ | 10,400 | 52,994 | 10,400 | 55,114 |
| एलडीओ | 10,700 | 71,058 | 10,700 | 73,900 |

पुढील तक्त्यामध्ये ऊर्जा आकारणीसाठी गृहीत धरलेली प्रचालनीय परिमाणे दिलेली आहे :

**तक्ता 3 : प्रचालनीय परिमाणे[1]**

| **विवरण** | **युनिट्स** | **2014–2015** | **2015–2016** |
|---|---|---|---|
| दिवसांची संख्या | | 365 | 366 |
| स्थापित क्षमता | MW | 600 | 600 |
| उपलब्धता | % | 85% | 85% |
| पीएलएफ | % | 85% | 85% |
| एकंदर निर्मिती | MU | 4,468 | 4,480 |
| सहायक खप (ऑक्सिलिअरी कन)* | % | 9.13% | 9.13% |
| निव्वळ निर्मिती | MU | 4,060 | 4,071 |
| स्टेशन हीट रेट (केंद्र उष्णता दर)** | kCal/kWh | 2,450 | 2,450 |
| विशेष तेल खप | ml/kWh | 1.00 | 1.00 |

टीप : *अतिरिक्त 0.13% सूट मिळण्यासाठी ऑक्स कन्स मध्ये विनंती केलेली आहे.

**प्रचालनीय आवश्यकतेशी जुळण्यासाठी एसएचआर सूट मिळण्यासाठी विनंती केलेली आहे.

***स्थिर आकारणी :*** याचिकादार, स्थिर आकारणीच्या घटकांचे अंदाज करताना विद्यमान नियमावलीवर म्हणजे एमईआरसी एमवायटी नियमावली, 2011, वर अवलंबून आहे. खालील तक्त्यामध्ये 2014–15 आणि 2015–16 या वर्षांसाठी दुसऱ्या एमवायटी कालावधीच्या स्थिर आकारणीचा सारांश आहे :

**तक्ता 4 : स्थिर आकारणी[2]**

| विवरण | 2014–15 | 2015–16 |
|---|---|---|
| ओ अँड एम खर्च (रु. कोटी) | 105.00 | 111.00 |
| घसारा | 205.61 | 205.61 |
| कर्जावरील व्याज | 321.54 | 300.42 |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | 47.37 | 48.12 |
| आयकर | 40.88 | 40.88 |
| समभाग भांडवलावरील उत्पन्न | 195.03 | 195.03 |
| **एकूण स्थिर खर्च** | **915.43** | **901.06** |

[1] *एमईआरसी एमवायटी नियमावली, 2011, तसेच याचिकेमध्ये आणि तिच्या जोडपत्रात तपशिलाने दिलेल्या कारणमीमांसेनुसार*

[2] *स्थिर आकारणीच्या वैयक्तिक घटकाचा अंदाज आणि अपेक्षित सूट ह्यासाठी सविस्तर कारणमीमांसा सुधारित याचिकेमध्ये आणि तिच्या जोडपत्रात सादर करण्यात आलेली*

आहे.

***एकंदर महसूली आवश्यकता :*** आव 2014–15 आणि आव 2015–16 साठी एआरआर खालील तक्त्यामध्ये सादर करण्यात आलेली आहे :

**तक्ता 5 : एकंदर महसूली आवश्यकता आणि प्रशुल्क**

| **विवरण** | **युनिट** | **2014–15** | **2015–16** |
|---|---|---|---|
| घसारा | रु. कोटी | 205.61 | 205.61 |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | रु. कोटी | 105.00 | 111.00 |
| दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | रु. कोटी | 321.54 | 300.42 |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | रु. कोटी | 47.37 | 48.12 |
| समभाग भांडवलावरील उत्पन्न | रु. कोटी | 195.03 | 195.03 |
| आयकर | रु. कोटी | 40.88 | 40.88 |
| एकूण स्थिर आकारणी | रु. कोटी | 915.43 | 901.06 |
| एकूण चल आकारणी | रु. कोटी | 506.76 | 535.49 |
| **एकंदर महसूली आवश्यकता** | रु. कोटी | 1422.19 | 1436.55 |
| निव्वळ निर्मिती | MU | 4,060 | 4,071 |
| स्थिर खर्च | रु. /kWh | 2.25 | 2.21 |
| चल खर्च | रु./kWh | 1.25 | 1.32 |
| **एकूण प्रशुल्क** | **रु./kWh** | **3.50** | **3.53** |

**प्रार्थना**

माननीय आयोगाकडे याचिकादाराच्या पुढील नम्र प्रार्थना आहेत :

(अ) सदर याचिका दाखल करून घ्यावी;

(ब) व्हीआयपीएलच्या बुटीबोरी प्रकल्पाकरिता 600 मेवॉ साठी हंगामी प्रशुल्कास मान्यता मिळावी;

(क) पुढील बाबींमध्ये निकष शिथिल करण्यास आणि/ किंवा अडचण निवारण करण्यास केलेल्या विनंतीस मान्यता मिळावी

- (i) स्टेशन हीट रेट;
- (ii) सहायक वीज खप; आणि
- (iii) परकीय चलनातील कर्जांच्या वारणासाठी (हेजिंग) होणाऱ्या खर्चावरील उपचार आणि/ किंवा परकीय चलनाच्या विनिमय दरात होणाऱ्या बदलांमुळे परकीय चलनातील कर्जांवर होणाऱ्या परिणामांवरील उपचार

(ड) विद्यमान याचिका लवकरात लवकर निकाली काढण्यात यावी;

(ई) याचिकेत अनवधानाने झालेल्या भूलचुका/त्रुटी माफ कराव्यात;

(फ) भविष्यात याचिकेत भर घालणे/बदल करणे/ फेरफार करणे/दुरुस्ती करणे ह्यास मान्यता मिळावी;

(ग) ह्या प्रकरणी परिस्थितीनुसार योग्य ते आदेश मिळावेत.